राज्यात Overseas Placement and Skill Development Center सुरु करण्यासाठी कार्यकारी समिती गठीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः कौविउ-२०१६/प्र.क्र.१८४/अभियान-१**
२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०९ फेब्रुवारी, २०१७

<u>वाचा</u> :- कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१६/प्र.क्र.१८४/अभियान-१, दिनांक ०४ जानेवारी, २०१७.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्याच्या कौशल्य विकास विभागाद्वारे विकसित केला जाणारा "Overseas Placement and Skill Development Center" हा अभिनव उपक्रम केंद्र शासनाच्या इमिग्रेशन ॲक्ट ,१९८३ या कायद्यामध्ये नमूद केलेल्या प्रावधानांतर्गत राबविण्याचे प्रस्तावित आहे.

त्यानुषंगाने राज्यात सदर केंद्रे स्थापन करण्यासाठी प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे अध्यक्षतेखाली विभागाच्या संदर्भाधीन दिनांक ०४/०१/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यकारी समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीच्या दिनांक १६/०१/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत सर्वानुमते ठरल्यानुसार केंद्र शासनाच्या महाराष्ट्रातील Ministry of External Affairs (Overseas Indian Affairs) तसेच कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन यांच्या कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :

राज्यातील परदेशात नोकरीकरिता जाण्यास इच्छूक व पात्र असलेल्या उमेदवारांच्या परदेशात रोजगार प्राप्त होण्यासाठी सामोरे जावे लागणा-या सर्व समस्यांवर समाधानकारक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने व राज्यातील कुशल/अर्धकुशल/अकुशल मनुषयबळाच्या परदेशातील मागणीनुसार इच्छूक उमेदवारांचा पुरवठा करणे याकरिता सर्वप्रथम मुंबई व नागपूर या दोन जिल्ह्यांच्या ठिकाणी "Overseas Placement and Skill Development Center" सुरु करण्याचे नियोजिले आहे.

२. सदर Overseas Placement and Skill Development Center स्थापन करण्यासाठी प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या कार्यकारी समितीमध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात येत आहे.

१) Protector of Emigrants/Director, Ministry of External Affairs (Overseas Indian Affairs), खिरा नगर, सांताक्रुज (प.), मुंबई. - सदस्य

२) कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन, पुणे. - सदस्य

४. सदर शासन निर्णय शासनाचे संकेत स्थळ www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०२१४१५०६०८४८०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

S.G. Patil

Digitally signed by S.G. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SDED, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f64f9296da4ba15d02d3ad3826a21a74ed080355ac04eef5617c3b4f08af47ae, cn=S.G. Patil
Date: 2017.02.14 15:08:46 +05'30'

**(सं.गि. पाटील)**
शासनाचे उप सचिव

**प्रत,**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय , मुंबई,
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय , मुंबई,
७. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
८. उपरोक्त समितीमधील सर्व सदस्य,
९. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१०. उपसचिव/अवर सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई,
१३. संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण ), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,मुंबई,
१४. सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक,
१५. उपसंचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक,
१६. निवड नस्ती (अभियान-१).